अनधिकृत बिनशेती वापराबाबत
करण्यात घेणाऱ्या दंडाबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक एनएए १०९०/प्र. क्र. १६/ल–२
मंत्रालय, मुंबई– ४०००३२
[redacted]
दिनांक : १७ जुलै, १९९२

पहा : १] शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग, क्र. एनएए १०७०/ ३८२१२–सी, दिनांक २१/१२/१९७०.
२] शासन पत्र [गोपनीय] क्रमांक एनएए १०८८/२०९१/सीआर– ११७ टी–२, दिनांक ७/१०/१९८७.

परिपत्रक :

शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग, क्र. एनएए १०७०/३८२१२–सी, दिनांक २१/१२/७० अन्वये शासनाने असे निर्देश दिले होते की, महाराष्ट्र जमिन महसूल [जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी] नियम १९६९ मधील नियम–८ व ९ अन्वये बिनशेती आकारणीच्या ४० पटी पर्यंत दंड करताना त्या प्रकरणातील वार्षिक बिनशेती आकारणी लक्षात घेऊन त्याचे पटीत दंड असावा असे निर्देश दिलेले आहेत तथापि, नियमामध्ये दंड करण्याची तरतूद असत= करताना फक्त तो ४० पटीपेक्षा जास्त असता कामा नये असे नमूद करुन किती दंड करावा हे जिल्हाधिकारी यांचे स्वेच्छाधिकाराखाली असताना उपरोक्त सूचना अनावश्यक असल्याचे शासनाला आढळून आल्याने त्या रद्द समजण्यात याव्यात

२ शासनपत्र [गोपनीय] क्रमांक एनएए १०८७/२०९१–सीआर–११७ दिनांक ७/१०/८७ अन्वये शासनाने अशा सूचना दिल्या आहेत की, ज्या प्रकरणी अनधिकृत बिनशेती वापर हेतुपुरस्सर केल्याचे आढळून येईल त्याप्रकरणी कमाल दंड करण्यात यावा. असे असता जिल्हाधिकारी सरसकट ४० पट दंड करुन शासनाचे आदेश आहेत असे प्रतिपादन करतात असे आढळून आले आहेत. ...पि ही धारणा बरोबर नसून जास्तीतजास्त दंड करणेबाबत विनंतीवजा सूचना या अनधिकृत बांधकाम करण्याची प्रवृत्तीचा बिमोड करण्याचे उद्देशाने ज्याप्रकरणी अनधिकृत बिनशेती वापर हेतुपुरस्सर होत आहे असे आढळून येईल अशा प्रकरणापुरत्या मर्यादित असून

जिल्हाधिकारी कार्यालय,
सातारा.
21 JUL 1992

कृ. मा. प.

त्यासुध्दा विनंतीवजा सूचना असून ते स्थायी आदेश नाहीत हे लक्षात घेणे आवश्यक आहे. पर्यायाने सक्षम अधिका-यांना प्रकरणाचे गुणावगुण लक्षात घेऊन तसेच प्रत्येक प्रकरणी साधक बाधक विचार करुन कारणमीमांसेच्या आधारे अनधिकृत अकृषिक दंडाची रक्कम ४० पटीपेक्षा कमी आकारण्याचा अधिकार वापरण्यास शासनाची हरकत नाही.

३. वरील सूचना सर्व संबंधित महसूल अधिका-यांच्या नजरेस आणण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा.सु.तायडे

[ भा.सु.तायडे ]

कक्ष अधिकारी,
महसूल व वन विभाग.